कामगार कल्याण जनसंपर्क विभाग

# ई - न्युजलेटर



## सोलापूर महानगरपालिका

Volume : Issue : Date : 08-04-2020

### कोरोना विषाणूच्या प्रादुर्भाव रोखण्याकरिता केलेल्या उपाययोजना

जगामध्ये कोरोना या अतिघातक विषाणूचा प्रार्दुभाव मोठया प्रमाणात जगामध्ये वाढत आहे. त्या पार्श्वभूमीवर सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने कोरोनाचे प्रादुर्भाव होऊ नये याकरिता काटेकोरपणे प्रशासकीय कामकाज मा.आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली चालू आहे.

शहरातील 1 ते 8 विभागीय कार्यालय अंतर्गत सर्व झाडूवाले, सफाई कर्मचारी, घनकचरा विभागाकडील घंटागाडी कचरा वाहतूक अविरतपणे काम करीत असून, घनकचरा विभागाकडून दि.18/3/2020 ते दि.07/04/2020 अखेर 4518 टन कचरा उचलण्यात आलेला आहे. या कर्मचा-यांना मास्क, हॅण्डग्लोज तसेच सॅनिटायझर देण्यात आलेले आहे. तसेच कर्मचा-यांना येण्या-जाण्यासाठी बसची व्यवस्था करण्यात आलेली आहे. त्यांच्या सोईसाठी मा.आयुक्त यांच्या आदेशानुसार वरील सर्व विभागाकडील कर्मचा-यांना नाष्टा व पाण्याची सोय देखिल करण्यात आलेली आहे.

याचबरोबर परराज्यातील सोलापूर शहरात आलेल्या व्यक्तींना 5 ते 6 ठिकाणी राहण्याची व त्याचबरोबर चहा, नाष्टा व भोजनाची सोय म.न.पा.च्या कडून करण्यात आलेली आहे. नूमवी प्रशाला, नार्थकोट प्रशाला, मंगळवेढेकर इन्स्टिटयुट, बी.सी.गर्ल होस्टेल, वोरोनोको प्रशाला, लेप्रेसी बेघर नवीन बिल्डींग इत्यादी ठिकाणी राहण्याची व भोजनाची सोय करण्यात आलेली आहे. केंगाव पोलिस हॉस्टेल, सोरेगांव एस.आर.पी.कॅम्प या ठिकाणी अलगीकरण केंद्राची सोय केलेली आहे.

संपर्क – @ -0217-2735280

